प्रकरण – पांच

# संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण

# प्रकरण – पांच

## संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण

५.१ प्रस्तावना

५.२ विद्यार्थी प्रश्नावलीव्दारा संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण

[१] पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक या संबंधीची उपयुक्त माहिती.

[२] अध्यनात पाठ्यपुस्तक व मार्गदर्शकाचा वापर.

[३] पाठ्यपुस्तक अध्ययनाला उपयुक्त असण्याची कारणे.

[४] मार्गदर्शक अध्ययनाला उपयुक्त असण्याची कारणे.

[५] विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून पाठ्यपुस्तक लेखनातील उणीवा.

[६] परीक्षा पध्दतीचे व पाठ्यपुस्तकाचे स्वरूप आणि मार्गदर्शकाचा वापर.

[७] विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तक लेखनासाठी सुचविलेले उपयुक्त बदल उपक्रम आणि सूचना.

५.३ अध्यापक प्रश्नावलीव्दारा संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण

[१] इतिहास अध्यापकांचा अध्यापनानुभव.

[२] इतिहास विषय शिकविणाऱ्या अध्यापकांची शैक्षणिक पात्रता.

[३] इतिहास पाठ्यपुस्तकाचा स्तर.

[४] इतिहास अध्यापनाचा नवा दृष्टीकोन आणि इतिहासाचे पाठ्यपुस्तक.

[५] अध्यापनात पाठ्यपुस्तकाचा वापर.

[६] अध्यापनात मार्गदर्शकाचा वापर.

[७] विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपयुक्त वाटण्याची अध्यापकांनी दिलेली कारणे.

[८] परीक्षा पध्दतीचे व पाठ्यपुस्तकाचे स्वरूप आणि मार्गदर्शकाचा वापर.

[९] अध्यापकांच्या दृष्टीकोनातून पाठ्यपुस्तक लेखनातील उणीवा.

[१०] अध्यापकांनी पाठ्यपुस्तक लेखनासाठी सुचविलेले उपयुक्त बदल, उपक्रम आणि सूचना.

५.४ पालक प्रश्नावलीव्दारा संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण

[१] पाल्याच्या अभ्यास विषयक पालकांच्या कल्पना.

[२] पाठ्यपुस्तक, मार्गदर्शक आणि अभ्यास.

[३] विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपयुक्त वाटण्याची पालकांनी दिलेली कारणे.

[४] परीक्षा पध्दतीचे व पाठ्यपुस्तकाचे स्वरूप आणि मार्गदर्शकाचा वापर.

[५] पालकांच्या दृष्टीकोनातून पाठ्यपुस्तक लेखनातील उणीवा.

[६] पालकांनी पाठ्यपुस्तक लेखनासाठी सुचविलेले उपयुक्त बदल, उपक्रम आणि सूचना.

५.५ समारोप -

# प्रकरण - पांच

## संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण

### ५.१ प्रस्तावना :-

मागील प्रकरणांत प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेल्या संशोधन पध्दतीचे स्वरूप, हेतु, महत्व याची चर्चा करून संशोधनासाठी आवश्यक त्या साधनसामुग्रीच्या उपलब्धतेसाठी वापरलेल्या विद्यार्थी, अध्यापक आणि पालक प्रश्नावलीचे विश्लेषणात्मक विवरण केले आहे. प्रस्तुत प्रकरणांत संशोधन साधनाच्या आधारे गोळा झालेल्या साधनसामुग्रीचे वर्गीकरण, विश्लेषण केले आहे.

### ५.२ विद्यार्थी प्रश्नावलीव्दारा संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण :-

माध्यमिक स्तरावर इयत्ता दहावीच्या इतिहास विषयाच्या अध्ययनात पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यांच्या वापराचा आढावा घेण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी एक "विद्यार्थी प्रश्नावली" तयार केली. या प्रश्नावलीची समग्र माहिती प्रकरण चार मध्ये [पहा प्रकरण चार पान क्रमांक ५८ ] दिलेली आहे. ही प्रश्नावली कराड शहरातील सात माध्यमिक शाळातील इयत्ता दहावीत शिकणाऱ्या शंभर विद्यार्थ्यांना देण्यात आली. सर्वच म्हणजे शंभर विद्यार्थ्यांनी ही प्रश्नावली भरून परत केली. प्रश्नावली भरून देणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी परिशिष्ट "इ" मध्ये देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी भरून दिलेल्या प्रश्नावल्यांचे वर्गीकरण व विश्लेषण येथे केले आहे. वर्गीकरण विश्लेषण करतानाच अन्वयार्थही लावलेला आहे.

[१] पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यासंबंधीची उपयुक्त माहिती :-

माध्यमिक शाळातील इयत्ता दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थीनीकडे सर्व पाठ्यपुस्तके व त्यांच्या मार्गदर्शिका आहेत किंवा कसे ? मार्गदर्शिका वापरण्या-संबंधी विषय शिक्षकानी सूचना केल्या किंवा कसे ? मार्गदर्शिका वापरण्यासंबंधी पालकानी प्रोत्साहन दिले किंवा कसे ? अध्ययनाला पाठ्यपुस्तक पुरेसे आहे काय ? पाठ्यपुस्तकाचा वापर न करता विद्यार्थी पास होऊ शकतील काय ? इत्यादी बाबी जाणून घेण्यासाठी विद्यार्थी प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक एक ते सहा या बंदिस्त प्रश्नांची योजना केली होती. प्रश्नाच्या अखेरीस "होय," "नाही" असे दोन पर्याय दिले होते. योग्य पर्याय ठेवून नको असलेला पर्याय खोडावयाचा होता.

प्रस्तुत प्रश्नांना विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादाचे सविस्तर वर्गीकरण पुढील सारणी क्रमांक ५.१ मध्ये केले आहे.

प्रस्तुत आलेख संदर्भित सारणीच्या समोर यावा या उद्येशाने विरुध्द बाजुने लावला आहे.

## सारणी क्रमांक ५.१

### पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यासंबंधीची माहिती.

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | होय | नाही |
|---|---|---|---|
| १] | आपणाकडे इयत्ता दहावीची सर्व पाठ्यपुस्तके आहेत काय ? | ९८ | २ |
| २] | पाठ्यपुस्तका बरोबर मार्गदर्शिका घेतल्या आहेत काय ? | ९५ | ५ |
| ३] | मार्गदर्शक वापरण्यासंबंधी विषय शिक्षकानी सूचना केल्या का ? | ८५ | १५ |
| ४] | मार्गदर्शक वापरण्यासंबंधी पालकानी प्रोत्साहन दिले का ? | ७२ | २८ |
| ५] | पाठ्यपुस्तकाचा वापर न करता तुम्ही पास होऊ शकाल का ? | ९० | १० |
| ६] | फक्त मार्गदर्शक अभ्यासाला पुरेसा आहे काय ? | ६५ | ३५ |

वरील सारणी क्रमांक ५.१ मधील प्रश्न क्रमांक एकच्या उत्तराच्या अनुरोधाने असे म्हणता येईल की, इयत्ता दहावीत शिकणाऱ्या जवळ - जवळ सर्वच विद्यार्थी विद्यार्थ्यांनीकडे सर्व विषयाची पाठ्यपुस्तके आहेत.

पालकांची गरिबी, घेतलेली पुस्तके हरवली या कारणामुळे शेकडा दोन टक्के विद्यार्थी विद्यार्थिनींकडे काही क्रमिक पुस्तके नाहीत. प्रश्न क्रमांक दोनच्या उत्तरावरून पाठ्यपुस्तका बरोबर अभ्यासासाठी मार्गदर्शिका घेतलेली विद्यार्थी संख्या जास्त आहे. सर्व पाठ्यपुस्तके ९८ टक्के विद्यार्थ्यांकडे आहेत तर पाठ्यपुस्तका-बरोबर मार्गदर्शिका घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९५ टक्के इतकी आहे. अभ्यासाला मार्गदर्शक वापरण्या संबंधीची सूचना शिक्षक देतात असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ८५ टक्के इतकी तर अभ्यासाला मार्गदर्शक वापरण्यास प्रोत्साहन पालक देतात असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ७२ टक्के इतकी आहे. मार्गदर्शक वापरण्यासंबंधी सूचना, प्रोत्साहन देणाऱ्या शिक्षकापेक्षा पालकांची संख्या कमी आहे, हे विद्यार्थ्यांनी दिलेल्या आकडेवारी वरून कळून येते. अभ्यासाला केवळ मार्गदर्शक पुरेसा आहे असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६५ टक्के इतकी तर पाठ्यपुस्तकाचा वापर न करताही पास होऊ म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९० टक्के इतकी आहे. यावरून पाठ्यपुस्तकापेक्षा मार्गदर्शकच अभ्यासाला उपयुक्त असल्याचे वरील आकडेवारी वरून स्पष्ट होते.

[२] अध्ययनात पाठ्यपुस्तक व मार्गदर्शिकाचा वापर :-

इयत्ता दहावीच्या इतिहास विषयाच्या अध्ययनासाठी पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यापैकी विद्यार्थी कशाचा जास्त उपयोग करतात, पाठ्यपुस्तकाचा अध्ययनासाठी जास्त उपयोग करत असतील तर त्याची कारणे आणि मार्गदर्शिकाचा वापर अध्ययनासाठी जास्त करत असतील तर त्याची कारणे कोणती याची माहिती करून घेण्यासाठी विद्यार्थी प्रश्नावलीत प्रश्नांची योजना केली होती. विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्तराच्या अनुरोधाने अध्ययनासाठी पाठ्यपुस्तकांचा वापर उपयुक्त आहे असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३५ टक्के आहे. तर अध्ययनासाठी मार्गदर्शक उपयुक्त आहे असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६५ टक्के आहे.

[३] पाठ्यपुस्तक अध्ययनाला उपयुक्त असण्याची कारणे :-

पाठ्यपुस्तक अध्ययनाला उपयुक्त असण्याची कारणे विद्यार्थ्यांनी पुढील प्रमाणे दिली आहेत.

[१] माध्यमिक शालांत परीक्षेची प्रश्नपत्रिका पाठ्यपुस्तकावरच निघते. उत्तरपत्रिका तपासणी पाठ्यपुस्तकाच्या आधारेच करतात. पाठ्यपुस्तकातील उत्तरांना पूर्ण गुण मिळतात.

[२] पाठ्यपुस्तकाच्या आधारे सुयोग्य उत्तरे लिहीता येतात.

[३] पाठ्यपुस्तकांतुन सर्वप्रश्नांचा सखोल अभ्यास करता येतो.

[४] पाठ्यपुस्तकाच्या साहाय्याने प्रत्येक घटकाचा सखोल अभ्यास होतो. विचारांची उंची वाढते.

[५] पाठ्यपुस्तकाने सर्व मुद्यांचे तपशिलासह मार्गदर्शन होते.

[६] पाठ्यपुस्तकातून भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर वर्तमान काळातील घडामोडींचे आकलन होते.

[७] मार्गदर्शिकातील प्रश्नोत्तरे समजण्यासाठी मूळ पाठ्यपुस्तकच हवे असते. मार्गदर्शिकात पाठ्यपुस्तकातील सर्व भागावर प्रश्न असत नाहीत.

[८] पाठ्यपुस्तकात अचूक संदर्भ असतो. मार्गदर्शिकात चुका असतात.

[९] पाठ्यपुस्तकाने एखाद्या घटकाचा संपूर्णपणे क्रमाक्रमाने अभ्यास होऊ शकतो.

[१०] पाठ्यपुस्तकांत मुद्यांचा अगोदरचा व नंतरचा संदर्भ विस्तृत व अचूक असतो.

[११] पाठ्यपुस्तकातून अभ्यास केल्यास स्वतःच्या भाषेत उत्तरे लिहीता येतात.

[१२] पाठ्यपुस्तकामध्ये एखाद्या घटकाविषयी सलग सविस्तर माहिती असल्यामुळे परीक्षेतील प्रश्नाचे योग्य उत्तर देता येते.

[१३] पाठ्यपुस्तक घटकाविषयी सखोल माहिती देते, तर मार्गदर्शिक फक्त प्रश्नोत्तरे देऊन विद्यार्थ्यांना परीक्षार्थी बनवितो.

[१४] मार्गदर्शिकामध्ये प्रश्नांची उत्तरे तयार असतात, त्यामुळे विद्यार्थ्यांची विचार करण्याची क्षमता नष्ट होते.

[१५] पाठ्यपुस्तकाच्या सखोल अभ्यासाने कोणत्याही प्रश्नाचे उत्तर तयार करता येते.

[१६] पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासाने गाळलेल्या जागासारखे वस्तुनिष्ठ प्रश्न सोडविण्यास अडचण येत नाही.

[१७] मार्गदर्शकात प्रश्नोत्तरे मर्यादित असतात. परीक्षेत विचारलेले प्रश्न मार्गदर्शकात असलीलच असे नाही. मात्र पाठ्यपुस्तकात त्याची उत्तरे निश्चित व अचूक मिळतात.

[१८] पाठ्यपुस्तकातील भाषा सोपी असते. आपल्याला आपल्या भाषेत सोप्या पध्दतीने उत्तर लिहीता येते व लक्षात राहते.

[१९] शिक्षक शिकवताना पाठ्यपुस्तकातील भाषा वापरतात. पुस्तक वाचल्यावर सहज लक्षात येते.

[२०] पाठ्यपुस्तकावरच मार्गदर्शक असल्याने पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

[२१] पाठ्यपुस्तकामुळे घटनांचा क्रम व्यवस्थीत लक्षात राहतो. त्यामुळे त्यावरुन अभ्यास केला असता धडा पूर्ण लक्षात राहतो व अभ्यास केल्याचे समाधान वाटते आणि कोणत्याही धड्यातील मुद्दे एकामागोमाग एक आठवतात.

[२२] मार्गदर्शकात जे प्रश्न येतात त्यापैकीच परीक्षेत येतील असे नाही. म्हणून मार्क मिळवायचे असतील तर पाठ्यपुस्तकच अभ्यासाला उपयुक्त आहे.

[२३] अभ्यासाला मार्गदर्शक वापरणे म्हणजे आपल्याला दुसऱ्याने चमच्याने भरविणे होय.

[२४] पाठ्यपुस्तक तयार करताना बऱ्याच वेळा त्याचे लेखन तपासलेले, परिश्रमपूर्वक अभ्यास करुन पाठ्यपुस्तक लिहीलेले असते. याउलट मार्गदर्शक वरवर घाईने गडबडीत तयार केले जातात. त्याच्या तपशिलात उणीवा, त्रुटी असतात.

## [४] मार्गदर्शक अध्ययनाला उपयुक्त असण्याची कारणे :-

अध्ययनासाठी मार्गदर्शक उपयुक्त आहे असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६५ टक्के आहे. मार्गदर्शक अध्ययनाला उपयुक्त असण्याची कारणे विद्यार्थ्यांनी पुढील प्रमाणे दिली आहे.

[१] मार्गदर्शकात प्रश्नांची उत्तरे मुद्देसूद दिलेली असतात.

[२] मार्गदर्शकांत प्रश्नाच्या अनुरोधाने फक्त उत्तरच असते. इतर पाठ्यांश त्यात नसतो.

[३] मार्गदर्शकांत प्रश्नाचे समाधान करणारे आवश्यक तेवढेच उत्तर असते.

[४] मार्गदर्शकात पुस्तकातील स्वाध्याय सोडवून दिलेला असतो.

[५] सर्वप्रकारचे प्रश्न, त्यांची उत्तरे यांचा भरपूर सराव होतो.

[६] जादा प्रश्नोत्तरे, स्पष्टीकरणे मार्गदर्शकात असतात.

[७] पाठ्यपुस्तकातील अनावश्यक माहिती वाचण्याची कटकट मार्गदर्शकात नसते.

[८] कमी वेळात, कमी श्रमात भरपूर अभ्यास होतो. परीक्षेला प्रश्नच फक्त विचारतात. मार्गदर्शकात वाचून त्यांची उत्तरे देता येतात.

[९] उत्तरे पाठ करावी लागतात. उत्तर पाठ करण्यास सोपे जाते.

[१०] मार्गदर्शकात समजेल अशा प्रकारची भाषा असते।

[११] पाठ्यपुस्तकात उत्तरे शोधून काढावी लागतात। मार्गदर्शकात विनासायास उत्तरे मिळतात।

[१२] प्रश्नांची उत्तरे सविस्तर असतात। उत्तरे जास्त ओळी लिहीता येतात।

[१३] प्रश्नाचे स्वरूप, प्रश्नाची रचना, प्रश्नाचा रोख याबाबी मार्गदर्शक वापरल्यानेच समजते।

[१४] मार्गदर्शकांत अपेक्षित प्रश्न, व्यवसायमाला अभ्यासासाठी दिलेल्या असतात।

[१५] मार्गदर्शकाने कोणत्या प्रश्नाचे उत्तर किती ओळी लिहीले पाहिजे याचा अंदाज येतो।

[१६] प्रश्नपत्रिकेचे स्वरूप कळते। त्यामुळे अभ्यासाची दिशा समजते।

[१७] पाठ्यपुस्तक वाचून सर्वच प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहीता येत नाहीत।

[१८] पाठ्यपुस्तक वाचून कोणता प्रश्न परीक्षेत येईल याचा अंदाज बांधता येत नाही।

[१९] अभ्यासाला सोपे, सुटसुटीत मार्गदर्शका सारखे दुसरे साधन नाही।

[२०] पाठ्यपुस्तकांत परीक्षेला महत्वाचा नसलेला भागही सक्तीने वाचावाच लागतो।

[२१] पाठ्यपुस्तकातून अभ्यास करतांना उत्तरे कोठे आहेत ते लवकर लक्षात येत नाही।

[२२] परीक्षा जवळ आल्यावर व परीक्षा चालू असताना पाठ्यपुस्तक वाचणे होत नाही शिवाय ते सोयीचेही नसते अशा वेळी मार्गदर्शक वापरण्याशिवाय पर्याय नसतो.

[२३] अभ्यासाची उत्तम तयारी करण्यासाठी मार्गदर्शक हाच खरा आधार आहे.

[२४] मार्गदर्शक हा पाठ्यपुस्तकावरच आधारित असतो. घटकानुसार लघुत्तरी, दीर्घोत्तरी, वस्तुनिष्ठ प्रश्न मार्गदर्शकात असतात. ह्या प्रश्नांची उत्तरे अचूक कशी लिहावीत याचे मार्गदर्शन मिळते. कोणते मुद्दे उत्तरात यावेत यासाठी ठळक अक्षरात काही मुद्दे दिलेले असतात. जे समजण्यास अवघड तेथे आकृती काढून स्पष्टीकरण केलेले असते. विद्यार्थ्यांनी आपल्या स्वत:च्या भाषेत उत्तरे लिहावीत यासाठी जादा प्रश्नही त्यात असतात. गत परीक्षेची प्रश्नपत्रिका त्यात असते. शिवाय संभाव्य प्रश्नपत्रिकाही दिलेली असते. यामुळे मार्गदर्शक अभ्यासाला पाठ्यपुस्तकापेक्षा उपयुक्त असतो.

अध्ययनातील मार्गदर्शक व पाठ्यपुस्तकाचा वापर करण्यामागे विद्यार्थ्यांनी दिलेल्या कारणांचा विचार केला असता पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यातील फरक आपल्या लक्षात येतो.

[५] <u>विद्यार्थी दृष्टीकोनातून पाठ्यपुस्तक लेखनातील काही उणीवा :-</u>

विद्यार्थ्यांना पाठ्य पुस्तकातून अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी समजून घेण्यासाठी व पाठ्यपुस्तक लेखनातील उणीवा, दोष समजून घेण्यासाठी विद्यार्थी प्रश्नावलित प्रश्नांची योजना केली होती. विद्यार्थ्यांनी त्याला दिलेल्या प्रतिसादानुसार पाठ्यपुस्तक

लेखनात उणीवा, दोष नाहीत म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २४ टक्के इतकी आहे. तर पाठ्यपुस्तक लेखनात उणीवा, दोष आहे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ७६ टक्के इतकी आहे.

पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करतांना येणाऱ्या अडचणी व पाठ्यपुस्तक लेखनातील उणीवा विद्यार्थ्यांच्याच शब्दांत खाली दिल्या आहेत.

[१] काही घटकांची माहिती अपुरी, त्रोटक व विस्कळीत स्वरूपाची आहे. "विल्सनची चौदा कलमी" योजनेत सर्व चौदा कलमांची माहिती नाही.

[२] पुस्तकाची भाषा बोजड आहे. शब्द रचना व वाक्यरचना वाचतांना अर्थबोध होत नाही.

[३] प्रश्नांची उत्तरे विस्कळीत स्वरूपात सापडतात. परिच्छेदात योग्य उत्तर नसते.

[४] कोणता भाग महत्वाचा, कोणता कमी महत्वाचा ही गोष्ट एकसूरी लेखनामुळे कळत नाही.

[५] स्वाध्यायातील प्रश्न व त्या घटकातील तद्संबंधीची माहिती यात निश्चितता नाही, त्यामुळे मुद्देसूद माहिती मिळत नाही.

[६] पाठ्यपुस्तकात धडे जास्त आहे.

[७] धड्याखालील प्रश्नात विविधता नाही.

[८] घटनानुक्रमे धडे नाहीत. उदाहरणार्थ दुसऱ्या महायुध्दाची घटना १९३९ ते १९४५ ला घडली. त्यानंतर भारतीय स्वातंत्र्य लढा १९२० ते १९४७ दिला आहे.

[९] इतिहासातील काही घटनांची सत्यचित्रे पुस्तकात नाहीत.

[१०] पाठ्यपुस्तकातील पाठ क्रमांक दोनच्या प्रारंभी व शेवटी दिलेल्या चित्रांचा अर्थबोध विद्यार्थ्यांना स्वतःच्या बुध्दीला ताण देऊनच समजून घ्यावा लागतो. पाठात त्यासंबंधी कुठेही उल्लेख नाही. इतर पाठाच्या प्रारंभी व शेवटी अशी चित्रे नाहीत.

[११] प्रश्नपत्रिकेत येणारे आठ गुणाचे दीर्घोत्तरी प्रश्न लिहीताना पाठ्यपुस्तकातील माहिती अपुरी पडते.

[१२] पाठ्यपुस्तकातून अभ्यास करताना आपल्या पुढे म्हणावे तसे प्रसंग उभे राहत नाहीत.

[१३] पाठ्यपुस्तक लेखनात अधिक गुंतागुंत केल्याने महत्त्वाचा भाग कोणता ते कळू शकत नाही. उदाहरणार्थ "नियोजनाच्या मार्गाने भारताचा आर्थिक विकास" या प्रकरणात कोणत्या योजनेत कोणत्या मुद्यावर अधिक भर दिला आहे हे चटकन लक्षात येत नाही.

[१४] वार्षिक परीक्षेतील इतिहास विषयाची गुणदान पध्दतीची माहिती उदाहरणासह दिलेली नाही.

[१५] पाठ्यपुस्तकाच्या शेवटी प्रश्नपत्रिका सोडवून दिलेली नाही.

[६] <u>परीक्षा पध्दतीचे व पाठ्यपुस्तकाचे स्वरूप आणि मार्गदर्शकाचा वापर :-</u>

"परीक्षा पध्दतीचे स्वरूप विचारात घेता विद्यार्थी अध्ययनासाठी मार्गदर्शक वापरतो" याला काय पुष्टी मिळते, याची माहिती घेण्यासाठी व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे स्वरूप "मार्गदर्शक - पाठ्यपुस्तका" सारखे हवे काय, हे जाणून घेण्यासाठी विद्यार्थी

प्रस्तुत आलेख संदर्भित सारणीच्या समोर यावा
या उधेशाने विरुध्द बाजूने लावला आहे.

प्रश्नावलीत प्रश्नांची योजना केली होती. विद्यार्थ्यांनी त्याला जो प्रतिसाद दिला तो पुढील सारणी क्रमांक ५.२ मध्ये दिला आहे.

सारणी क्रमांक ५.२

परीक्षा पध्दतीचे व पाठ्यपुस्तकाचे स्वरुप आणि मार्गदर्शकाचा वापर

| अ. क्र. | वि धा न | सहमत | असहमत | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | परीक्षा पध्दतीचे स्वरुपच मार्गदर्शक वापरण्यास कारणीभूत आहे. | ९३ | ७ | १०० |
| २. | पाठ्यपुस्तकाचे स्वरुप "मार्गदर्शक पाठ्यपुस्तका" सारखे हवे. | ८० | २० | १०० |

परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचे स्वरुप आणि एकूण गुणदान पध्दतीची माहिती मार्गदर्शकात असल्याने "परीक्षा पध्दतीचे स्वरुपच मार्गदर्शक वापरण्यास कारणीभूत आहे" या विधानाला सहमत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९३ टक्के इतकी आहे. पाठ्यपुस्तकातील विस्तृत माहिती आणि त्यातील क्लिष्टता यातून उत्तरे शोधून काढण्यापेक्षा पाठ्यपुस्तकच "मार्गदर्शक पाठ्यपुस्तक" असावे असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ८० टक्के इतकी आहे. पाठ्यपुस्तकापेक्षा मार्गदर्शकच विद्यार्थी अध्ययनात अधिक वापरत असल्याचे स्पष्ट होत आहे.

[७] विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तक लेखनासाठी सुचविलेले उपयुक्त बदल, उपक्रम व सूचना :-

पाठ्यपुस्तक अधिक निर्दोष व्हावे, तंत्रशुध्द व्हावे आणि विद्यार्थ्यांनी त्याचा वापर अधिकाधिक करावा यासाठी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक लेखनात कोणते बदल हवेत, त्यासाठी त्यांच्याकडून उपयुक्त सूचना आणि उपक्रम सुचविण्यासाठी विद्यार्थी प्रश्नावलीत प्रश्नांची योजना केली होती. विद्यार्थ्यांनी त्याला जो प्रतिसाद दिला व जे त्यानी बदल सुचविले, ज्या सूचना केल्या, जे उपक्रम सुचविले ते त्यांच्याच शब्दात खाली दिले आहे.

[१] पाठ्यपुस्तकाची भाषा सर्वांना समजेल अशी सोपी असावी.

[२] महत्वाच्या घटना, महत्वाचे मुद्दे, महत्वाचे प्रश्न ठळक अक्षरात छापावे.

[३] पाठ्यपुस्तकातील स्वाध्यायात वाढ करावी.

[४] महत्वपूर्ण परिच्छेदाला जोडून रोचक चित्रे हवीत.

[५] दीर्घोत्तरी प्रश्नांच्या उत्तरासाठी मुद्देसूद भरपूर माहिती असावी.

[६] पाठ्यपुस्तकातील धडे कमी करावेत.

[७] "भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास" एवढाच अभ्यासक्रम पाठ्यपुस्तकात हवा. पहिली दोन प्रकरणे व "स्वातंत्रोत्तर भारत" ही प्रकरणे काढून टाकावीत.

[८] पाठ्यपुस्तका खेरीज इतर कोणतीच पुस्तके उपलब्ध नसावीत.

[९] पाठ्यपुस्तकाच्या शेवटी बोर्डाच्या प्रश्नपत्रिका नमुन्या दाखल सोडवून दिल्या जाव्यात.

[१०] वारंवार परीक्षा घेऊन पाठ्यपुस्तकातून बघून लिहीण्यास सांगितल्यास पाठ्यपुस्तक मुले वाचतील.

[११] पाठ्यपुस्तकात बदल नको. फक्त शिक्षकानी तळमळीने रोचकतापूर्वक शिकवावे.

[१२] वर्गात मुलाकडून सामूहिक मूकवाचन करण्याचा तास घ्यावा. वाचल्यावर प्रश्न विचारावेत.

[१३] पाठ्यपुस्तक लेखनाने ऐतिहासिक प्रसंग डोळ्यापुढे उभे रहावेत.

[१४] परीक्षा पध्दतीत प्रात्यक्षिक भरपूर ठेवावे. पाठ्यपुस्तकांतही प्रात्यक्षिकाचा भाग असावा.

[१५] धड्याची मांडणी प्रश्नोत्तरी स्वरुपात असावी.

[१६] सन, वार, दिनांक आणि घटना यांचा पाठाच्या शेवटी समावेश करावा.

[१७] पाठाच्या प्रारंभी पाठाचा थोडक्यांत सारांश द्यावा.

[१८] घटनांचे वर्णन विस्तृत मुद्देसूद द्यावे. ते दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर ठरावे.

[१९] घटना क्रमवार असाव्यात. दोन घटनांची गुंफण केलेली असावी. घटनात तुटकपणा नसावा.

[२०] पाठ्यपुस्तकाचे लेखन हे परीक्षा पध्दतीच्या स्वरुपाप्रमाणे असावे.

[२१] ऐतिहासिक घटना, व्यक्तींची कार्ये, राष्ट्रीय सभेची अधिवेशने, इत्यादी तक्ते पाठयपुस्तकात द्यावेत. उदाहरणार्थ रसायनशास्त्राचे पाठयपुस्तक.

[२२] पाठयपुस्तकात विद्यार्थ्यांना देशाभिमानी बनविण्याच्या घटना असाव्यात.

[२३] खरा इतिहास पाठयपुस्तकांत द्यावा.

[२४] रोमांचकारी, मनोरंजक ऐतिहासिक कथा पाठयपुस्तकात असावीत.

[२५] मुख्य म्हणजे शाळेत अध्यापकांनी पाठयपुस्तकातून अभ्यास कसा करावयाचा हे समजून द्यावे. अध्यापकांना इतिहासाचे ज्ञान अधिक हवे. तरच ते आम्हाला ज्ञान देऊ शकतील.

प्रस्तुत सूचनांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, विद्यार्थ्यांनी काही चांगल्या सूचना केलेल्या आहेत. उदाहरणार्थ पाठयपुस्तकातील भाषा सोपी असावी, स्वाध्यायात वाढ करावी, मुद्याचे विस्तृत विवेचन असावे, अभ्यासक्रम कमी असावा, "भारतीय-स्वातंत्र्याचा इतिहास" एकदाच भाग असावा, पाठयपुस्तकात नमुना प्रश्नपत्रिका उत्तरासह सोडवून दिलेली असावी, पाठयपुस्त-कात प्रात्यक्षिकाचा भाग द्यावा, पाठाच्या प्रारंभी पाठाची सारांशरूपाने माहिती द्यावी, ऐतिहासिक घटना, व्यक्तींची कार्ये, सन आणि घटना यांचे तक्ते पाठयपुस्तकात असावेत, खरा इतिहास पाठयपुस्तकात द्यावा, घटना क्रमवार असाव्यात, दोन घटनांची गुंफण तिलमा करावी, विद्यार्थ्यांच्या ठायी देशाभिमान ही वृत्ती वाढीस लागण्या इतपत पाठयलेखन प्रभावी व अध्यापका-चेही अध्यापन प्रभावी व्हावे, बोलक्या ऐतिहासिक चित्रांचा वापर व्हावा इत्यादी सूचना स्वागतार्ह आहेत.

## ५.३ अध्यापक प्रश्नावली व्दारा संकलित माहितीचे – वर्गीकरण व विश्लेषण :-

माध्यमिक स्तरावर इयत्ता दहावीच्या इतिहास विषयाच्या अध्यापनात पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यांच्या वापराचा आढावा घेण्यासाठी एक अध्यापक प्रश्नावली तयार केली. या प्रश्नावलीची समग्र माहिती प्रकरण चार मध्ये [ पहा प्रकरण चार पान क्रमांक ] ६०] दिलेली आहे. अध्यापक प्रश्नावली परिशिष्ट "ब" मध्ये दिलेली आहे. ही प्रश्नावली कराड शहरातील सात माध्यमिक शाळातील दहावीला इतिहास विषय शिकविणा-या सर्वच्या सर्व म्हणजे एकूण पंधरा अध्यापकांना देण्यात आली. सर्वच अध्यापकांनी प्रश्नावली भरुन परत केली. प्रश्नावली भरुन देणा-या अध्यापकांची यादी परिशिष्ट "ई" मध्ये दिलेली आहे.

अध्यापकांनी भरुन दिलेल्या प्रश्नावल्यांचे वर्गीकरण व विश्लेषण येथे केले आहे.

### [१] इतिहास अध्यापकांचा अध्यापनानुभव :-

अध्यापक प्रश्नावलींच्या प्रारंभीच अध्यापकांना माध्यमिक शाळेतील अध्यापनाचा अनुभव नोंदविण्यासाठी एक रकाना दिला होता. त्यांनी नोंदविलेल्या अनुभवाचे वर्गीकरण पुढील सारणी क्रमांक ५.३ मध्ये केले आहे.

## सारणी क्रमांक ५.३

## इतिहास अध्यापकांचा अध्यापनानुभव

| अ.क्र. | अध्यापनानुभव [वर्षांच्या वर्गांतरामध्ये] | अध्यापक संख्या |
|---|---|---|
| १ | २९ – ३१ | २ |
| २ | २६ – २८ | ३ |
| ३ | २३ – २५ | ३ |
| ४ | २० – २२ | १ |
| ५ | १७ – १९ | २ |
| ६ | १४ – १६ | २ |
| ७ | ११ – १३ | १ |
| ८ | ८ – १० | ० |
| ९ | ५ – ७ | १ |
| | एकूण | १५ |

वरील सारणी क्रमांक ५.३ वरुन असे दिसून येते की, प्रश्नावलींना प्रतिसाद देणाऱ्या अध्यापकांचा अध्यापनानुभव कमीत कमी पांच वर्षांपासून जास्तीत जास्त एकतीस वर्षांपर्यंत आहे. हा अनुभव कोणत्याही मानदंडाने मोजला तरी दीर्घ आहे.

सारणी क्रमांक ५.३ वरुन इतिहास अध्यापकांच्या अध्यापनानुभवाचे मध्यमान पुढील प्रमाणे काढता येईल.

| वर्गांतरे | वारंवारिता | विचलन | गुणाकार |
|---|---|---|---|
| २९ – ३१ | २ | ३ | ६ |
| २६ – २८ | ३ | २ | ६ |
| २३ – २५ | ३ | १ | ३ |
| २० – २२ | १ | ० | ० |
| | | | १५ |
| १७ – १९ | २ | – १ | – २ |
| १४ – १६ | २ | – २ | – ४ |
| ११ – १३ | १ | – ३ | – ३ |
| ८ – १० | ० | – ४ | – ० |
| ५ – ७ | १ | – ५ | – ५ |
| | | | – १४ |

$$\text{मध्यमान} = \text{गृहीत मध्यमान} + \frac{\text{गुणाकार}}{\text{एकुण गुण}} \times \text{वर्गांतर लांबी}$$

$$= २१ + \frac{१}{१५} \times ३$$

$$= २१ + \frac{१}{५}$$

$$= २१ + .२०$$

$$= २१.२०$$

कराड शहरातील माध्यमिक शाळेतील अध्यापकांच्या अध्यापनानुभवाचे मध्यमान २१.२० वर्षे इतके आहे. हा अनुभव निश्चितच दीर्घ आहे.

[२] इतिहास विषय शिकविणा-या अध्यापकांची शैक्षणिक पात्रता :-

इतिहास अध्यापकांची शैक्षणिक पात्रता जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीत एक रकाना भरावयाची योजना केली होती. प्रस्तुत योजनेला दिलेल्या –

प्रतिसादाचे पुढील सारणी क्रमांक ५.४ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.४

इतिहास विषय शिकविणाऱ्या अध्यापकांची शैक्षणिक पात्रता :-

| पदवी | अध्यापकांची संख्या |
|---|---|
| बी.ए.बी.एड. | ६ |
| एम्. ए. बी. एड. | ८ |
| एम्. ए. एम्. एड. | १ |
| | १५ |

यावरून हे सर्व अध्यापक माध्यमिक शाळेत शिकविण्यासाठी आवश्यक असलेली कमीत कमी शैक्षणिक अर्हता धारण करतात. हे कळून येते. एवढेच नव्हे तर एम्. ए. बी.एड. आठ तर एम.ए.एम.एड. एक पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता धारण करणारे शिक्षकही आहेत. ही बाब निश्चितच समाधानकारक आहे.

तथापि पदवी परीक्षेला "इतिहास" विषय असणे आवश्यक आहे, हे जाणून घेण्यासाठी इतिहास विषय शिक्षकाशी चर्चा करून पदवी-पदव्युत्तर परीक्षेचा मुख्य विषय आणि बी.एड. व्यावसायिक पदवीची अध्यापन पध्दती कोणती होती याची विचारणा करण्यात आली होती.

त्यानी दिलेल्या माहितीच्या आधारे पदवी• पदव्युत्तर परीक्षेचा मुख्य विषय व बी• एड• च्या अध्यापन पध्दती पुढील सारणी क्रमांक ५.५ मध्ये दिल्या आहेत•

सारणी क्रमांक ५.५

पदवी-पदव्युत्तर परीक्षेचा मुख्य विषय आणि बी• एड• च्या अध्यापन पध्दती :-

| पदवी | विषय | अध्यापक संख्या |
|---|---|---|
| बी• ए• बी• एड्• | बी• ए• इतिहास<br>बी• एड• इतिहास, मराठी | ४ |
| बी• ए• बी• एड् | बी• ए• – मराठी<br>बी• एड• – मराठी, इतिहास | २ |
| एम्• ए• बी• एड्• | एम• ए• – इतिहास<br>बी• एड• – इतिहास, मराठी | ५ |
| एम्• ए• बी• एड्• | एम• ए• – मराठी<br>बी• एड• – मराठी, इतिहास | ३ |
| एम्• ए• एम्• एड्• | एम• ए• – हिंदी<br>बी• एड्–इतिहास, हिंदी<br>एम• एड – [सर्व थेअरी पेपर्स] | १ |

प्रस्तुत आलेख संदर्भित सारणीच्या समोर यावा
या उद्देशाने विरुध्द बाजूने लावला आहे.

वरील सारणी क्रमांक ५.५ वरुन असे दिसून येते की, इतिहास विषयाचे अध्यापन करणाऱ्या सर्व अध्यापकांच्या पदवी, पदव्युत्तर आणि बी.एड. अध्यापन पध्दती मध्ये कोठे ना कोठे इतिहास विषय आहे. ही फार समाधानाची बाब आहे.

[३] इतिहास पाठ्यपुस्तकाचा स्तर :-

इयत्ता दहावीच्या मुलांचा वयोगट विचारात घेता इतिहास पाठ्यपुस्तकाचा स्तर कोणता आहे हे जाणून घेण्यासाठी अध्यापक प्रश्नावलीत प्रश्नांची योजना केली होती. त्यात सोपा-मध्यम - कठीण असे तीन पर्यायी स्तर दिले होते. योग्य स्तरावर अशी खूण करावयास सांगितली होती. अध्यापकांनी या प्रश्नाला जो प्रतिसाद दिला. त्याचे वर्गीकरण पुढील सारणी क्रमांक ५.६ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.६

इतिहास पाठ्यपुस्तकाचा स्तर

| पाठ्यपुस्तकाचा स्तर | अध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| सोपा | ०२ | १३.३३ |
| मध्यम | १० | ६६.६७ |
| कठीण | ०३ | २०.०० |
| | १५ | १००.०० |

वरील सारणी क्रमांक ५.६ वरुन असे दिसून येते की, इयत्ता दहावीच्या इतिहास पाठ्यपुस्तकाचा स्तर मध्यम आहे असे म्हणणाऱ्या

अध्यापकांची संख्या जास्त म्हणजे ६६.६७ टक्के इतकी आहे. " समाजातील सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांच्या गरजा, त्यांचा वयोगट, त्यांची आकलनशक्ती लक्षात घेऊन इतिहास पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे" हा महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यास अभ्यास संशोधन मंडळाचा दावा खरा असल्याचे कळून येते.

(४) इतिहास अध्यापनाचा नवा दृष्टीकोन आणि - इतिहासाचे पाठ्यपुस्तक :-

इतिहास अध्यापनाचा नवा दृष्टीकोन इतिहास अध्यापकांना माहित आहे काय ? तसेच इतिहास अध्यापनाच्या नव्या दृष्टीकोनातून दहावीच्या इतिहास पाठ्यपुस्तकाचे लेखन झाले आहे काय ? या बाबी जाणून घेणे प्रस्तुत संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक असल्याने अध्यापक प्रश्नावलीत प्रश्नांची योजना केली होती. या प्रश्नांना अध्यापकांनी जो प्रतिसाद दिला तो पुढील सारणी क्रमांक ५.७ मध्ये दिला आहे.

प्रस्तुत आलेख संदर्भित सारणीच्या समोर यावा या उद्देशाने विरुद्ध बाजूने लावला आहे.

सारणी क्रमांक ५.७

इतिहास अध्यापनाचा नवा दृष्टीकोन आणि इतिहास पाठ्यपुस्तकाच्या लेखना बाबतचे मत :-

| विधान | अध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| इतिहास पाठ्यपुस्तकाचे लेखन इतिहास अध्यापनाच्या नव्या दृष्टीकोनातुन झाले आहे. | १३ | ८६.६७ |
| "इतिहास पाठ्यपुस्तकाचे लेखन इतिहास अध्यापनाच्या नव्या दृष्टीकोनातुन झाले नाही. | ०२ | १३.३३ |
| | १५ | १००.०० |

वरील सारणी क्रमांक ५.७ वरुन दिसुन येते की, इतिहास अध्यापनाच्या नव्या दृष्टीकोनातुन इतिहास पाठ्यपुस्तकाचे लेखन झाले आहे, असे म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या ८६.६७ टक्के इतकी आहे. ही आकडेवारी समाधानकारक आहे.

इतिहास अध्यापनाचा नवा दृष्टीकोन इतिहास अध्यापकांना माहित आहे आणि इतिहास पाठ्यपुस्तकाचे लेखन इतिहास अध्यापनाच्या नव्या दृष्टीकोनातून झाले आहे व इतिहास अध्यापनाचा नवा दृष्टीकोन इतिहास पाठ्यपुस्तकातूनच साध्य होतो या गोष्टी बहुसंख्य इतिहास अध्यापकांनी मान्य केल्या आहेत. ही खचितच समाधानाची बाब आहे.

[५] अध्यापनात पाठ्यपुस्तकाचा वापर :-

इतिहास अध्यापनाचा नवा दृष्टीकोन साध्य करण्याचे इतिहासाचे पाठ्यपुस्तक हे प्रमुख साधन आहे. इतिहास अध्यापकांकडून इतिहास विषयाच्या अध्यापनात पाठ्यपुस्तकाचा उपयोग कसा आणि केव्हा केला जातो हे जाणून घेण्यासाठी अध्यापक प्रश्नावलीत प्रश्नाची योजना केली होती. इतिहास पाठ्यपुस्तकाचा वापर कशासाठी कशाप्रकारे केला जातो याची जी मीमांसा अध्यापकांनी केली आहे. ती त्यांच्याच शब्दांत खाली दिली आहे.

[१] पाठाची तयारी करण्यासाठी.

[२] घटना व मुद्दे योग्यक्रमाने विशद करण्यासाठी.

[३] आवश्यक तेथे विवेचन करतांना व संदर्भ देताना.

प्रस्तुत आलेख संदर्भित सारणीच्या समोर यावा
या उद्देशाने विरुध्द बाजूने लावला आहे.

[४] प्रश्नोत्तरे अचूक यावी म्हणून.
[५] एखाद्या घटकाचे सखोल ज्ञान मिळविण्यासाठी.
[६] पाठाचे काळजी पूर्वक वाचन करण्यासाठी.
[७] थोर नेत्यांचे विचार समजून घेण्यासाठी.

अध्यापनांत पाठ्यपुस्तकाचा वापर करण्यामागील वरील मुद्यांचा विचार केला तर पाठ्यपुस्तक ज्या कारणांसाठी अध्यापकांनी वापरावे ती अशी अपेक्षा असते ती येथे सफल झाल्याचे दिसून येते.

[६] अध्यापनात मार्गदर्शिकाचा वापर :-

इतिहास अध्यापनात पाठ्यपुस्तका बरोबर अध्यापकांकडून मार्गदर्शिकाचा वापर केला जात असल्यास तो कशाप्रकारे वापर होतो हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीत योजना केली होती. याला अध्यापकांनी जो प्रतिसाद दिला त्याचे पुढील सारणी क्रमांक ५.८ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.८

अध्यापनात मार्गदर्शिकाचा वापर

| वि धा न | अध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| अध्यापनासाठी मार्गदर्शिकाचा वापर करतो. | ३ | २० |
| अध्यापनासाठी मार्गदर्शिकाचा वापर करत नाही. | १२ | ८० |
| | १५ | १०० |

वरील तारणी क्रमांक ५.८ वरून अध्यापनासाठी मार्गदर्शिकाचा वापर न करणाऱ्या अध्यापकांची संख्या मार्गदर्शिकाचा वापर करणाऱ्या अध्यापकांच्या संख्येपेक्षा जास्त म्हणजे ८० टक्के इतकी आहे. ही समाधानाची बाब आहे. अध्यापनासाठी मार्गदर्शिकाचा वापर करणाऱ्या अध्यापकांची संख्या २० टक्के इतकी आहे. अध्यापनासाठी मार्गदर्शिकाचा वापर का व कशाप्रकारे केला जातो यांचे स्पष्टीकरण त्यांच्याच शब्दांत खाली दिले आहे.

[१] सर्वसामान्य बुध्दीमतेचा विद्यार्थी अभ्यासात मागे राहिलेला दिसतो, तेव्हा त्यांना मार्गदर्शिकाच्या आधारे संदर्भ द्यावे लागतात.

[२] अध्यापनात मार्गदर्शिकाचा वापर शक्यतो करत नाही. अगदी शेवटी एक महिना परीक्षा राहिल्यावर त्यातील प्रश्न उजळणीदाखल विचारतो.

[३] मार्गदर्शिकाचा वापर शक्यतो केला जात नाही. मात्र दीर्घोत्तरी प्रश्नात उत्तराचे कोणते व किती मुद्दे असावेत यासाठी मार्गदर्शिकाचा वापर करतो.

[४] शक्यतो मार्गदर्शिक वापरत नाही. फक्त त्यातील जादा माहिती मुलांना देतो.

अध्यापनात मार्गदर्शिकाचा वापर करण्यामागील वरील मुद्यांचा विचार करता मुलांच्या अभ्यासातील प्रगती साधण्यासाठीचा हा प्रयत्न आहे. हे जरी सत्य असले तरी मुलांच्या समोर मार्गदर्शिकाचा वापर करणे म्हणजे मार्गदर्शिकाचे महत्व पाठ्यपुस्तकापेक्षा जास्त आहे, हे ठसविणे होय. असा वापर अग्राह्य आहे. व्यासंग, जिज्ञासा आणि

अधिक माहिती या वृत्तीतून मार्गदर्शक हा अध्यापकाला स्वयं अध्ययनासाठी एक पूरक साधन ठरावा.

[७] <u>विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपयुक्त वाटण्याची अध्यापकांनी दिलेली- कारणे</u> :-

अध्ययनात पाठ्यपुस्तकापेक्षा विद्यार्थी मार्गदर्शक अधिक वापरण्यामागे कोणती कारणे आहेत, याचा अध्यापकांच्या दृष्टीकोनातून अभ्यास करण्यासाठी अध्यापक प्रश्नावलीत प्रश्नक्रमांक नऊची योजना केली होती. अध्यापकांनी जी कारणे दिली आहेत ती त्यांच्याच शब्दात खाली दिली आहे.

[१] विद्यार्थ्यांना स्वत: अभ्यास करुन प्रश्नांची उत्तरे तयार करणे अवघड वाटते.

[२] त्याना तयार प्रश्नोत्तरे मिळतात.

[३] प्रश्नपत्रिकेनुसार प्रश्नांची मांडणी त्यात केलेली असते.

[४] विद्यार्थ्यांना इतिहासा सारखा विषय कमी महत्वाचा वाटतो. त्यामुळे पुस्तक वाचून उत्तरे तयार करण्यापेक्षा "तयार" उत्तरे पाठ करुन पास होण्याची त्यांची प्रवृत्ती असते.

[५] विद्यार्थ्यांची कष्ट करण्याची प्रवृती कमी झाली आहे.

[६] कमी श्रमात सहजासहजी सर्वच एकत्र मिळते.

[७] केवळ परीक्षेपुरता अभ्यास करण्याची प्रवती असल्यामुळे मार्गदर्शक उपयुक्त वाटतो.

[८] उत्तरे मुद्देसूद असतात.

[९] अचूक मार्गदर्शन्, वेळेची बचत, निश्चित ज्ञान्, कमी वेळेत जास्त फायदा.

[१०] त्यात किचकटपणा, पाल्हाळीकपणा नसतो.

[११] सर्व प्रश्न प्रकरणानुसार संचाच्या स्वरूपात वाचावयाला मिळतात.

[१२] "कमी श्रमात यश" मिळविण्याच्या पाठीमागे लागणारा विद्यार्थी.

पाठ्यपुस्तकापेक्षा मार्गदर्शक अधिक उपयुक्त वाटण्या मागील जी कारणे अध्यापकांनी दिलेली आहेत ती वस्तुस्थितीला धरून सत्य आहेत. वस्तुस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून मार्गदर्शक वापरा विषयक समस्या निश्चितच सुटेल.

[८] परीक्षा पध्दतीचे व पाठ्यपुस्तकाचे स्वरूप आणि मार्गदर्शकाचा - वापर :-

परीक्षा पध्दतीचे स्वरूपच मार्गदर्शक वापरण्यास कारणीभूत ठरत आहे किंवा कसे ? आणि त्यावरून मग पाठ्यपुस्तकाचे स्वरूप मार्गदर्शक पाठ्यपुस्तका सारखे असावे काय ? याबाबत अध्यापकांची मते अजमाविण्यासाठी प्रश्नावली प्रश्नांची योजना केली होती. अध्यापकांनी प्रस्तुत प्रश्नांना जो प्रतिसाद दिला त्याचे वर्गीकरण पुढील सारणी क्रमांक ५.९ मध्ये दिले आहे.

प्रस्तुत आलेख संदर्भित सारणीच्या समोर यावा
या उद्देशाने विरुद्ध बाजूने लावला आहे.

सारणी क्रमांक ५.९

परीक्षा पध्दतीचे व पाठ्यपुस्तकाचे स्वरूप आणि मार्गदर्शकाचा-

वापर :-

| अ.नं. | वि धा न | सहमत-अध्यापक | असहमत अध्यापक | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | परीक्षा पध्दतीचे स्वरूपच मार्गदर्शक वापरण्यास-कारणीभूत आहे. | १५ | ० | १५ |
| २. | पाठ्यपुस्तकाचे स्वरूप मार्गदर्शक पाठ्यपुस्तका-सारखे हवे. | २ | १३ | १५ |

वरील सारणी क्रमांक ५.९ वरून "परीक्षा पध्दतीचे स्वरूपच मार्गदर्शक वापरण्यास कारणीभूत आहे". या विधानाला १५ पैकी सर्वच्या सर्व अध्यापकानी सहमती दर्शविली आहे. या विधानाला १०० टक्के सहमती दर्शविणा-या अध्यापकानी मात्र "पाठ्यपुस्तकाचे स्वरूप मार्गदर्शक पाठ्यपुस्तका सारखे हवे कां ? या प्रश्नाला १५ पैकी १३ अध्यापकानी म्हणजे ८६.६७ टक्के असहमती दर्शविली आहे. पाठ्यपुस्तक"पाठ्यपुस्तकच" असावे त्याचा मार्गदर्शक होऊ नये. अशीच त्यांची इच्छा दिसते. ही त्यांची इच्छा इतिहास - अध्यापनाच्या नव्या दृष्टीकोनाला अनुसरूनच आहे. ही बाब खचितच समाधानाची आहे.

"परीक्षा पध्दतीचे स्वरूपच मार्गदर्शक वापरण्यास कारणीभूत आहे" या विधानाला १०० टक्के सहमती दर्शविणाऱ्या अध्यापकानी जी कारणे दिली आहेत. ती त्यांच्याच शब्दांत खालील प्रमाणे.

[१] एक-दोन वाक्यातील उत्तरे, वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहीणे मार्गदर्शकामुळे शक्य होते. परीक्षा पध्दतीत असे प्रश्न असल्याने मुलांना तयार उत्तरे मार्गदर्शकात मिळतात.

[२] प्रश्नांचे स्वरूप, त्यांची उत्तरे, प्रश्न विचारण्याची पध्दती सोडविलेले गुणदान पध्दतीची माहिती, नमुना प्रश्न इत्यादी बाबी मार्गदर्शकात दिलेल्या असतात.

[३] "झटपट विद्या" या मनोवृत्तीची वाढ विद्यार्थ्यात झालेली आहे.

[४] प्रश्नांचे स्वरूप इतके वस्तुनिष्ठ असते की, स्वतःच्या विचाराला वाव नाही.

[५] साचेबंद प्रश्नपत्रिका पध्दती, लघुत्तरावर भर, त्यामुळे ठराविक साचा तयार केल्यास विद्यार्थ्यांना नापासाची भिती नसते.

"पाठयपुस्तकाचे स्वरूप मार्गदर्शक पाठयपुस्तका सारखे असावे. या विधानाला असहमती दर्शविणाऱ्या अध्यापकांची संख्या ८६.६७ इतकी आहे. असहमती दर्शविताना त्यानी जी कारणे दिली आहेत

ती त्यांच्यात शब्दात खाली दिली आहेत.

[१] तो विषय पूर्ण समजू शकणार नाही.

[२] उद्दिष्ट पूर्ती विषयांचे ज्ञान अपुरे पडेल.

[३] विद्यार्थ्यांनी पाठ्यलेखनाचे वाचन करावे, मनन करावे, विचार करावा व त्यावर स्वतःच्या बुध्दीने उत्तरे लिहावीत या गोष्टी साध्य होणार नाहीत.

[४] जर पाठ्यपुस्तक मार्गदर्शक झाला तर विद्यार्थी स्वयं - अध्ययनापासून दूर राहील.

[५] पाठ्यपुस्तकाचे स्वरुप मार्गदर्शक पाठ्यपुस्तका प्रमाणे केल्यास विद्यार्थी फक्त परीक्षेचाच विचार करुन अभ्यास करेल. पाठातील इतर माहितीकडे त्याचे दुर्लक्ष होईल. त्यामुळे इतिहास शिकविण्याची उद्दिष्टे सफल होणार नाहीत

इतिहास शिक्षणाच्या नव्या दृष्टीकोनाची पूर्तता व्हायची असेल तर ती पाठ्यपुस्तकानेच होऊ शकेल. मार्गदर्शनात्मक पाठ्यपुस्तक प्रश्नोत्तरालाच फक्त उपयुक्त ठरेल असा विचार वरील कारणांच्या अभ्यासाने दिसून येत आहे.

[९] <u>अध्यापकांच्या दृष्टीकोनातून पाठ्यपुस्तक लेखनातील उणीवा :-</u>

इयत्ता दहावीच्या इतिहास पाठ्यपुस्तक लेखनात काही उणीवा आहेत का ? दोष आहेत का ? याची माहिती इतिहास अध्यापकाकडून मिळविण्यासाठी प्रश्नावलीत योजना केली होती. या प्रश्नाला अध्यापकांनी जो प्रतिसाद दिला होता तो त्यांच्याच शब्दांत खालील प्रमाणे दिला आहे.

[१] संदर्भ देताना कालानुरूप सुसंगती दिसत नाही.

[२] काही ठिकाणी मुद्दे आहेत, पण स्पष्टीकरण समाधान-कारक नाही. उदाहरणार्थ १९३५ च्या कायद्यातील सर्व तरतूदी दिल्या नाहीत.

[३] स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास त्रोटक आहे.

[४] प्राचीन काळच्या वैभवशाली इतिहासाची नोंद नाही.

[५] इतिहास पाठ्यपुस्तकातील सर्व घटनांचे तपशील सुसंगतवार व पूर्ण सत्यावर आधारित नाहीत. उदाहरणार्थ नेताजी सुभाषचंद्रांचे अध्यक्ष पदातील वाद, फाळणीचा खरा इतिहास, जागतिक स्तरावर भारताचे परराष्ट्रीय धोरणातील उणीवा.

[६] प्रकरणाच्या भोवती प्रश्न कमी आहेत.

[७] काही व्यक्तींची चरित्रे परिणामकारकपणे सांगितली नाहीत.

[८] पाठ्यपुस्तकाची छपाई अस्पष्ट आहे.

[९] काही प्रकरणे सविस्तर नाहीत. त्यामुळे फक्त उल्लेख करून एखादा भाग सोडल्याने विद्यार्थ्यांना तो भाग वाचताना आकर्षित करीत नाही. उदाहरणार्थ क्रांतीकारक प्रकरण, प्रति सरकार, पहिल्या महायुध्दाची कारणे.

[१०] पाठ्यपुस्तकामध्ये घटनांची जास्त रेलचेल झाली आहे.

[११] माहिती अपुरी शिवाय विस्कळीत आहे. प्रश्नांची उत्तरे कशी शोधायची ? हा प्रश्न विद्यार्थ्यांपुढे निर्माण होतो.

पाठ्यपुस्तकातील वरील उणीवा पैकी क्रमांक चारची उणीवा ही पाठ्यपुस्तक लेखनाच्या अभ्यासक्रमात बसत नाही. बाकीच्या सर्व उणीवा ह्या अभ्यासपूर्ण विचार प्रवर्तक अशा स्वरूपाच्या आहेत.

[१०] अध्यापकांनी पाठ्यपुस्तक लेखनासाठी सुचविलेले उपयुक्त बदल, उपक्रम आणि सूचना :-

पाठ्यपुस्तक अधिक निर्दोष व्हावे, तंत्रशुध्द व्हावे, उद्दिष्टानुरूप त्याचे लेखन व्हावे, इतिहास अध्यापनाच्या नव्या दृष्टीकोनानुसार त्याचे लेखन व्हावे, विद्यार्थी व अध्यापक यांच्याकडून त्याचा वापर अधिकाधिक व्हावा या भूमिकेतून पाठ्यपुस्तक लेखनात कोणते बदल हवेत, त्यासाठी उपयुक्त सूचना आणि उपक्रम सुचविण्यासाठी अध्यापक प्रश्नावलीत प्रश्नांची योजना केली होती. अध्यापकांनी त्याला जो प्रतिसाद दिला व जे त्यानी बदल सुचविले ज्या सूचना दिल्या, जे उपक्रम सुचविले ते त्यांच्याच शब्दांत खाली दिले आहेत.

[१] संदर्भ कालानुरूपच असावेत. माहिती देताना ती शक्यतो मुद्यानुरूप द्यावी. एकाच परिच्छेदात अनेक मुद्दयांच्या उहापोह केलेला असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना ते कंटाळवाणे वाटते. ते टाळावे.

[२] पाठ्यपुस्तकातील प्रश्नांचे मुद्दे ठळक अक्षरात लिहावेत. सर्व प्रकारचे प्रश्न दिलेले असावेत. धड्याची मध्यवर्ती कल्पना थोडक्यात असावी.

[३] पाठ्यपुस्तकातील महत्वाचे प्रसंग अधोरेखीत करावेत. प्रसंगाची मांडणी मुद्देसूद असावी.

[४] पाठ्यपुस्तक नव्या तरूण पिढीला खरा [सत्य] इतिहास शिकविणारे असावे.

[५] दिलेल्या प्रकरणावर विस्तृत माहिती द्यावी. त्यामध्ये जास्तीत जास्त सर्वप्रकारचे [लघुत्तरी दीर्घोत्तरी व वस्तुनिष्ठ ] प्रश्न असावेत.

[६] पाठ्यपुस्तकात दिलेला इतिहास हा सलग असावा.

[७] विद्यार्थ्यांचे वय लक्षात घेऊन इतिहासाच्या मांडणीतील काठीण्य असावे.

[८] केवळ सनावळ्या व कारणे यापेक्षा त्याकाळातील बदल सोप्या भाषेत मांडावा.

[९] पाठ्यपुस्तकाचे उद्दिष्टानुरूप लेखन करताना विद्यार्थ्यांची उत्सुकताही लक्षात घ्यावी.

[१०] मांडणी आकर्षक करावी. योग्य त्या ठिकाणी चित्रांचा वापर केला जावा. स्वाध्याय अधिकाधिक द्यावा.

[११] इतिहास व नागरिकशास्त्र यांची वेगळी पुस्तके असू नयेत. पुस्तक बांधणी उत्तम, आकर्षक व टिकाऊ असावी.

[१२] पाठ्यपुस्तकाची रचना प्रश्नपत्रिकेनुसार व्हावी. अभ्यासक्रम कमी करावा. अनावश्यक तपशील वगळावा.

[१३] इतिहास पाठ्यपुस्तकातून नवीन दिशा देणारे ज्ञान मिळाले पाहिजे.

[१४] पाठ्यपुस्तकाचे मुखपृष्ठ आकर्षक असावे.

[१५] शिक्षकांनी इतिहास विषय पुस्तक वाचून शिकवू नये.

[१६] पाठाच्या वेळी विद्यार्थ्यांसमोर पाठ्यपुस्तक नसावे.

[१७] शिक्षकांनी पूर्ण तयारी करुन गोष्टीरुपाने इतिहास शिकवावा.

[१८] इतिहास या विषया बद्दल मुलामध्ये आवड निर्माण होणे हे शिक्षकावरच अवलंबून आहे. व त्या यशावरच पाठ्य-पुस्तक वापराची वृत्ती व गुणात्मक वाढ सुध्दा अवलंबून आहे.

इतिहासाचे पाठ्यपुस्तक कसे असावे या संबंधीच्या केलेल्या सुचना या सर्वच विषयाच्या पाठ्यपुस्तकाना कमी अधिक प्रमाणात लागू पडतात. उदा. पाठ्यपुस्तकाची भाषा सुबोध, मनोरंजक असावी. मुद्देसूद मांडणी, टाईप मोठा, ठळक व योग्य असावा. माहितीत क्रम असावा. पुरेसे स्पष्टीकरण असावे. विद्यार्थ्यांचे वय, आवड व आकलन क्षमता विचारात घेतली जाऊन पाठ्यपुस्तक तयार करावे.

या व्यतिरिक्त केलेल्या सूचनाही स्वीकारणीय आहेत. त्या म्हणजे पाठ्यपुस्तक नव्या तरुण पिढीला खरा इतिहास शिकविणारे असावे. पाठ्यपुस्तकाचे उद्दिष्टानुरुप लेखन करताना विद्यार्थ्यांची उत्सुकताही लक्षात घ्यावी, इतिहास व नागरिकशास्त्र यांचे एकच पुस्तक असावे, अभ्यासक्रम कमी करावा.

अध्यापन करताना पाठ्यपुस्तक हे एक साधन आहे. इतिहासाच्या अध्यापनातून संपन्न व्यक्तिमत्व घडावे, राष्ट्रीय भावना वाढीस लागावी हे अंतिम साध्य आहे. याचे भान ठेवूनच विद्यार्थ्यांच्या गरजा, शिक्षकांच्या अडचणी यासर्व गोष्टींचा सूक्ष्म व सखोल विचार करुनच पाठ्यपुस्तक लिहीले जावे असे सुचवावेसे वाटते.

## ५.४ पालक प्रश्नावलीद्वारा संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण :-

इयत्ता दहावीत शिकत असलेला आपला पाल्य इतिहास विषयाच्या अभ्यासाठी पाठ्यपुस्तकाचा व मार्गदर्शिकाचा उपयोग किती, कसा व का करतो ? पालकांच्या पाल्याच्या अभ्यासा - विषयीच्या कल्पना कोणत्या ? पाठ्यपुस्तकाचा वापर, मार्गदर्शकाचा वापर यात तो काय फरक करतो ? यासर्व बाबी त्याच्या पातळी - वर अजमावण्यासाठी एक पालक प्रश्नावली तयार केली या प्रश्नावली - ची समग्र माहिती प्रकरण चार मध्ये [ पहा प्रकरण चार पान कृमांक ६२ ] दिलेली आहे. पालक प्रश्नावली परिशिष्ट "क" मध्ये दिलेली आहे. ही प्रश्नावली ज्यांची मुले-मुली कराड शहरातील सात माध्यमिक शाळात इयत्ता दहावीला आहेत अशाच कराड शहरातील पन्नास पालकांना देण्यात आली. सर्वच पालकांनी प्रश्नावली भरून परत केली. जे पालक निरक्षर आहेत त्यांची प्रश्नावलीच्या अनुरोधाने मुलाखत घेऊन त्यांची मते त्यात नोंद केली. प्रश्नावली भरून देणाऱ्या पालकांची यादी परिशिष्ट "प" मध्ये दिलेली आहे.

पालकांनी भरून दिलेल्या प्रश्नावल्यांचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावलेला आहे.

### [१] पाल्याच्या अभ्यासाविषयीच्या पालकांच्या कल्पना :-

आपल्या पाल्य इयत्ता दहावीत आहे. इयत्ता दहावी माध्यमिक स्तरावरील महत्वाचे वर्ष आहे. दहावीची परीक्षा सुध्दा माध्यमिक शालांत परीक्षा मंडळ घेते. अशा स्थितीत आपल्या पाल्याने अभ्यास खूप केला पाहीजे अशी पालकांची सर्वसामान्य अपेक्षा

असणे गैर नाही. यासंबंधी पालकांच्या पाल्याच्या अभ्यासा विषयक आणखी काही कल्पना असणे स्वाभाविक आहे. त्या जाणून घेण्यासाठी पालक प्रश्नावलीत प्रश्नाची योजना केली होती. पालकांनी या प्रश्नाला जो प्रतिसाद मिळाला, तो पालकांच्याच शब्दांत खाली दिला आहे.

[१] जास्तीत जास्त अभ्यास करुन जास्तीत जास्त गुण मिळविणे, जास्त टक्केवारीने पास होणे.

[२] दररोज प्रत्येक विषयाचा अभ्यास करुन सर्वच विषयात ६० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणे.

[३] गुणाची टक्केवारी वाढावी म्हणून अभ्यास करावा. प्रश्नांची संभाव्य रचना व त्यांची गुण वाढविण्याच्या दृष्टीने दिलेली उत्तरे यावर भर द्यावा असे वाटते.

[४] पाल्याने नियमित अभ्यास करुन उज्वल यश संपादन करावे. जास्तीत जास्त वेळ अभ्यासासाठी दिला पाहिजे. रोज शिकविलेला भाग विद्यार्थ्यांनी घरी आल्यानंतर त्याचा अभ्यास करणे.

[५] पाल्यानी आपला अभ्यास मन लावून स्वतंत्रपणे करावा.

[६] त्याने अभ्यास चांगला करावा, मार्क्स चांगले मिळवून त्याने पहिल्या वर्गात पास व्हावे.

[७] नियमित सर्वच विषयाचा समतोल अभ्यास करावा.

[८] शालेय वेळ सोडून दररोज कमीत कमी आठ तास अभ्यास करावा. सकाळ व संध्याकाळ नियमित अभ्यास करावा.

[९] नियमित अभ्यास करुन कमीत कमी ४५ टक्के गुण मिळवून दहावी उत्तीर्ण व्हावे।

[१०] चालू काळात ८० टक्केचे पुढे गुण मिळणे आवश्यक आहे। तरच त्याला पुढील शिक्षणासाठी चांगल्या कॉलेजात प्रवेश मिळेल. त्या दृष्टीने अभ्यास करणे आवश्यक आहे।

पालकांच्या पाल्याच्या अभ्यासा विषयींच्या अपेक्षांचा विचार करता असे दिसून येते की, पाल्याने खूप अभ्यास करावा. पहिल्याच वर्षी पास व्हावे, चांगल्या गुणानी पास व्हावे. चांगली मार्कस् पडली तरच त्याला पुढे चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळेल. दहावीचे वर्ष महत्वाचे आहे. इत्यादी त्यांच्या अभ्यासाविषयींच्या कल्पना ह्या चालू परिस्थितीला धरूनच आहेत. निरक्षर पालकांना मात्र वाटते त्याने पास व्हावे. अभ्यास करावा. त्यांच्या कल्पनेला ही बाब साजेशीच अशीच आहे.

[२] पाठ्यपुस्तक, मार्गदर्शक आणि अभ्यास :-

आपला पाल्य दहावीत आहे. त्याला पाठ्यपुस्तके घेऊन देणे, मार्गदर्शक घेऊन देणे, जे जे मागेल ते ते पुरविणे याबाबी पालक कर्तव्य बुध्दीने पार पाडतो. याविषयी पालकांचा अधिक विस्तृत दृष्टीकोन, प्रश्नांची योजना केली होती. पालकांनी या प्रश्नांना जो प्रतिसाद दिला त्याचे वर्गीकरण पुढील सारणी क्रमांक ५.१० मध्ये दिले आहे.

प्रस्तुत आलेख संदर्भित सारणीच्या समोर यावा
या उद्देशाने विरुध्द बाजूने लावला आहे.

## सारणी क्रमांक ५.१०

## पाठयपुस्तक, मार्गदर्शक आणि अभ्यास :-

| अ.नं. | प्रश्न | होय | नाही |
|---|---|---|---|
| १] | दरवर्षी पाल्याला नवीन पुस्तके घेऊन देता ? | ४२ | ८ |
| २] | मार्गदर्शक घेण्याचा आग्रह पाल्य करतो-कां ? | ४६ | ४ |
| ३] | "मार्गदर्शक घे पण दहावी पास हो" हा दृष्टीकोन जोपासता काय ? | ४८ | २ |
| ४] | इयत्ता दहावीचे पाठयपुस्तक जिज्ञासा म्हणून पाहिले आहे कां ? | २१ | २९ |
| ५] | पाठयपुस्तकच अभ्यासाला वापर हा आग्रह करता कां ? | १० | ४० |

वरील सारणी क्रमांक ५.१० वरून पुढील प्रमाणे निष्कर्ष निघतात.

पाल्याला प्रत्येक वर्षी नवीन पुस्तके घेऊन देणाऱ्या पालकांची संख्या ५० पैकी ४२ आहे. ही बाब समाधानकारक आहे. आठ पालकच गरिबीमुळे, ग्रंथालयातून पुस्तके मिळाल्यामुळे, थोरला भाऊ-बहिण दहावीत असल्याने त्यांची पुस्तके त्याना मिळाल्यामुळे नवीन पुस्तके घेऊ शकले नाहीत.

पाठ्यपुस्तका बरोबर मार्गदर्शक घेण्याचा आग्रह पाल्य करतो अशी कबुली देणाऱ्या पालकांची संख्या ५० पैकी ४६ आहे. मार्गदर्शक अभ्यासाला उपयुक्त आहे याची जाणीव विद्यार्थ्यांना झाल्याचे यावरून दिसते. फक्त चारच पालकांची मुले मार्गदर्शक घेण्याचा आग्रह करत नाहीत. त्यांचे पालक हे शिक्षक, मुख्याध्यापक व शाळेशी संबंधित सेवक आहेत.

मार्गदर्शकच नव्हेतर जे जे अभ्यासाला पाल्य मागेल ते ते पुरविण्याचा दृष्टीकोन जोपासणारे पालक ५० पैकी ४८ आहेत. म्हणजे "दहावी पास हो", परीक्षा पास हो" हाच त्यांचा व्यवहारी दृष्टीकोन दिसून येतो. व त्यात गैर असे काहीं नाही.

इयत्ता दहावीचे इतिहास पाठ्यपुस्तक जिज्ञासा म्हणून पाहणारे पालक फक्त २१ आहेत. व्यासंग, पेशा, अभ्यासूवृत्ती, पाल्याचा अभ्यास घेणे या वृत्तीतून हे घडून येते. ५० पैकी २९ पालकांनी इतिहासच नव्हे तर इतर कोणतेही पाठ्यपुस्तक पाहिलेले नाही. अज्ञान, निरक्षरता, पोटापाण्याचे प्रश्न "आमची जबाबदारी नाही, शाळा अभ्यास करून घेईल" ही वृत्ती, फुरसत नसणे, व्यसनी पालक इत्यादी कारणानी हे घडून येते, आणि ते वास्तव सत्य आहे.

अभ्यासाला पाठ्यपुस्तकच वापर असा आग्रह धरणारे पालक ५० पैकी फक्त दहाच आहेत. अभ्यासाला मुला जे सोपे जाते तेच वापर, आम्हांला त्यात काय कळणार ? " त्याचा अभ्यास आणि तो" या भूमिकेमुळे पाठ्यपुस्तकच अभ्यासाला वापर असा आग्रह न करणारे पालकच जास्त म्हणजे ५० पैकी ४० आहेत. पालकांची जी पाल्याच्या अभ्यासाविषयी सर्वसाधारण भूमिका असते तीच येथे दिसून येते.

[३] विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपयुक्त वाटण्याची पालकांनी दिलेली कारणे :-

पाठ्यपुस्तकापेक्षा मुले अभ्यासाला मार्गदर्शकाचा वापर अधिक कां करतात ? यासंबंधीची कारणे पालक कोणती देतात याचा शोध घेण्यासाठी प्रश्नावलीत योजना केली होती. पालकांनी यासंबंधी जी कारणे दिली ती त्यांच्याच शब्दांत खाली दिली आहेत.

[१] पाठ्यपुस्तकातून विचार करुन उत्तरे शोधावी लागतात. काही उत्तरे संदिग्ध स्वरुपात असल्यामुळे नेमके उत्तर कोणते ते समजत नाही. मार्गदर्शकामध्ये लगेच उत्तरे मिळतात.

[२] परीक्षेतील वस्तुनिष्ठ प्रश्नांची रचना व त्यावर दिलेला भर.

[३] मार्गदर्शकात दिलेले प्रश्न जसेच्या तसे परीक्षाला येतात.

[४] "मागणी तसा पुरवठा" हे तत्व मार्गदर्शके पाळतात व पूर्ण करतात.

[५] पाठ्यपुस्तकात प्रश्नांची संख्या कमी असते. मार्गदर्शकात अधिक प्रश्न, विविध प्रकारचे प्रश्न असतात.

[६] मार्गदर्शकामध्ये पाल्याला सर्व काही तयार मालमसाला मिळतो.

[७] शाळेत पण शिक्षकांकडून मार्गदर्शक घेण्याचा आग्रह करण्यात येतो व शिक्षक पण मार्गदर्शकावरुनच शिकविण्यास प्राधान्य देतात.

[८] घडयाखाली दिलेल्या प्रश्नापैकीच प्रश्न येतील अशी खात्री नसल्यामुळे, दुसरे कोणतेही प्रश्न येण्याची शक्यता असते. ते प्रश्न मार्गदर्शकात मिळतात.

[९] आजकाल प्रत्येकास वेळच पुरत नाही. ही समस्या आहे. पालकांना पण तेवढा त्यांचा अभ्यास घेणेस जमत नाही. प्रत्येकाची शाळेची वेळ, कामाची वेळ हे काही एकमेकास पूरक नसतात. त्यामुळे शेवटी काय तर मार्गदर्शक मागितले तर घ्या, नको म्हणता येत नाही. त्यातून शिक्षकांनाही जादा शिकविण्यास वेळ नसतो. त्यामुळे मुले विचारणार कुठे सगळेच हुशार नसतात. त्यामुळे साधारण विद्यार्थ्यास ते कठीण जाते. ह्या सर्वांना उपाय म्हणून मुले मार्गदर्शक वापरतात.

[१०] एस. एस. सी. परीक्षेत पूर्वी विचारलेल्या प्रश्नोत्तरांचा समावेश, येत्या परीक्षेत यापैकीच प्रश्न विचारले जातील असा अंदाज विद्यार्थी करतात.

[११] आजकालच्या मुलांना अभ्यासाबाबत जास्त कष्ट करावे असे वाटत नाही.

[१२] मार्गदर्शकाची जास्त जाहीरात बाजी झाली आहे.

[१३] शाळेतील शिक्षकच मार्गदर्शक वापरतात ही जाणीव विद्यार्थ्यांना असते.

[१४] कमी वेळात जास्त अभ्यास मार्गदर्शकाने होतो.

पाल्य अभ्यासाठी पाठयपुस्तकापेक्षा मार्गदर्शक अधिक वापरण्यामागील कारणांचा शोध पालकांनी अगदी डोळसपणे,

प्रस्तुत आलेख संदर्भित सारणीच्या समोर यावा
या उद्देशाने विरुध्द बाजूने लावला आहे.

अभ्यासूपणे केल्याचा दिसून येतो. कारण क्रमांक चार, सात, नऊ, अकरा, बारा व तेरा ही कारणे विद्यार्थ्यांनी आणि अध्यापकांनी दिलेल्या कारणापेक्षा जादा कारणे असून ती अभ्यासू व वास्तव आहेत.

[४]] परीक्षा पध्दतीचे व पाठ्यपुस्तकाचे स्वरूप आणि मार्गदर्शकाचा वापर :-

परीक्षा पध्दतीचे स्वरूपच मार्गदर्शक वापरण्यास कारणीभूत ठरत आहे किंवा कसे ? आणि त्यावरून मग पाठ्यपुस्तकाचे स्वरूप मार्गदर्शकासारखे असावे काय ? याबाबत पालकांची मते अजमाविण्यासाठी प्रश्नावलीत प्रश्नांची योजना केली होती. पालकांनी प्रस्तुत प्रश्नांना जो प्रतीसाद दिला त्याचे वर्गीकरण पुढील सारणी क्रमांक ५.११ मध्ये दिले आहे.

सारणी क्रमांक ५.११

परीक्षा पध्दतीचे व पाठ्यपुस्तकाचे स्वरूप आणि - मार्गदर्शकाचा वापर :-

| अ. नं. | वि धा न | सहमत पालक | असहमत पालक | एकूण |
|---|---|---|---|---|
| १] | परीक्षा पध्दतीचे स्वरूपच मार्गदर्शक वापरण्यास कारणीभूत आहे. | ४२ | ८ | ५० |
| २] | पाठ्यपुस्तकाचे स्वरूप मार्गदर्शक पाठ्यपुस्तका सारखे हवे. | १३ | ३७ | ५० |

वरील सारणी क्रमांक ५.११ वरून परीक्षा पध्दतीचे स्वरूपच मार्गदर्शक वापरण्यास कारणीभूत आहे. त्या विधानाला सहमती दर्शविणाऱ्या पालकांची संख्या ५० पैकी ४२ आहे. त्यानी जी कारणे दिली आहेत त्यामध्ये बरीच पुनरावृत्ती झाल्याचे दिसून आले. ती टाळून असलेली कारणे त्यांच्याच शब्दांत खाली दिली आहेत.

[१] परीक्षा पध्दती प्रमाणेच मार्गदर्शकात प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली असतात.

[२] वस्तुनिष्ठ व लघुत्तरी प्रश्न मार्गदर्शकामधून एकत्र करता येतात.

[३] परीक्षा पध्दती ही Subjective Method ची नसल्यामुळे मार्गदर्शक वापरावे लागतात.

[४] परीक्षेत प्रश्न कसा बदलून विचारला जाईल हे मार्गदर्शकात दिलेले असते.

[५] संपूर्ण अभ्यास करण्यापेक्षा ३५ टक्के मार्क मिळवून पास होणे मार्गदर्शकाने शक्य होते.

[६] परीक्षेत प्रश्नपत्रिकेचा साचा ठराविक असतो. या परीक्षेत येते ते सर्व मार्गदर्शकात असते.

[७] जे परीक्षेत येते ते सर्व मार्गदर्शकात असते.

"परीक्षा पध्दतीचे स्वरूपच मार्गदर्शक वापरण्यास कारणीभूत आहे" या विधानाला असहमती दर्शविणारे पालक फक्त आठ आहेत. त्यांच्यामते केवळ परीक्षा पध्दतीचे स्वरूपच मार्गदर्शक वापरण्यास कारणीभूत नसून मार्गदर्शका बाबतचा समाज दृष्टीकोन, त्याची

जाहीरात बाजी, शाळेत अनियमीत जाणे, शाळेत व्यवस्थित न शिकविणे, शिकवूनही न कळल्यामुळे मुले मार्गदर्शक वापरतात. हे त्यांचे म्हणणे वस्तुस्थितीला धरूनच आहे असे म्हणावेसे वाटते.

"पाठ्यपुस्तकाचे स्वरूप मार्गदर्शक पाठ्यपुस्तका सारखे असावे. या विधानाला असहमती दर्शविणाऱ्या पालकांची संख्या ५० पैकी ३७ आहे. पाठ्यपुस्तक मार्गदर्शकासारखे नसावे याला त्यानी जी कारणे दिली आहेत त्यात बरीच पुनरावृत्ती झाल्याचे दिसून आले. ती पुनरावृत्ती टाळून असलेली कारणे त्यांच्याच शब्दांत खाली दिली आहेत.

[१] पाठ्यपुस्तक हे पाठ्यपुस्तकच रहावे त्याचे गाईड होऊ नये.
[२] इतिहासामध्ये सलगता राहणार नाही.
[३] पाठ्यपुस्तक रोचक, आकर्षक होणार नाही.
[४] सखोल अभ्यास होणार नाही.
[५] पाठ्यपुस्तक हे बुध्दीचे खाद्य आहे हे विसरू नये.
[६] विद्यार्थ्यांची विचार करण्याची शक्तीच नष्ट होईल.
[७] घटना, त्यांचा क्रम आणि स्पष्टीकरण याना वावच राहाणार नाही.
[८] विद्यार्थ्यांकडूनच फक्त असे पाठ्यपुस्तक वाचले जाईल.
[९] असे पाठ्यपुस्तक फक्त प्रश्नोत्तराने माहिती पुरविल. दृष्टीकोन निर्माण करू शकणार नाही.

पाठ्यपुस्तकाचे स्वरूप मार्गदर्शका सारखे असावे असे म्हणणाऱ्या पालकांची संख्या ५० पैकी १३ आहे. त्यानी आपल्या सहमतीच्या स्पष्टीकरणार्थ अचूक उत्तरे मिळणे, खात्रीने पास होणे, अभ्यासात प्रवृत्त होणे, वेळेची बचत होणे इत्यादी कारणे दिली आहेत.

### ८.५ पालकांच्या दृष्टीकोनातून पाठयपुस्तक लेखनातील उणीवा :-

इयत्ता दहावीच्या इतिहास पाठयपुस्तक लेखनात काही उणीवा आहेत कां ? कोठे दोष आहेत कां ? याचा पालकाकडून शोध घेण्यासाठी प्रश्नावलीत विचारणा केली होती. या प्रश्नाला पालकांनी जो प्रतिसाद दिला तो त्यांच्याच शब्दात खाली दिला आहे.

[१] महत्वाचे शब्द व सनावळ्यांचा मोठा टाईप नाही.

[२] इतिहास लेखनात तेजाचा अभाव आहे.

[३] इतिहास हा गौरवाची गाथा वाटत नाही.

[४] क्रांतीकारकांचे गुणगौरव कमी, कमी शब्दांत केला आहे.

[५] पाठयपुस्तकात फक्त प्रश्न दिले आहेत. पाठाचा थोडक्यांत सारांशाही द्यावा.

[६] प्रश्नपत्रिकेत ज्या ज्या प्रकारचे प्रश्न विचारले जातात त्या - त्या प्रकारचे प्रश्न धड्याखाली नसतात.

[७] प्रश्नाच्या उत्तरात जेवढे मुधे अपेक्षित असतात तेवढे मुधे पाठयपुस्तकांत नाहीत.

[८] काही मुदयाचे स्पष्टीकरण अपूर्ण आहे. उदा. १९३५ चा सुधारणा कायदा व्दिदल राज्य पध्दती, प्रति सरकारचा १२ कलमी कार्यक्रम दिला नाही. महायुध्दांची मुद्देसुद कारणे दिली नाहीत.

[९] इतिहासात काही तरी हातचे राखून लिहील्या सारखे वाटते. कठोर सत्य किंवा तार्किक दृष्टया बरोबर यापासून पाठयपुस्तकाची फारकत झालेली दिसते.

वरील उणीवा ह्या पाठ्यपुस्तकाचे पुनर्लेखन करण्याच्या कामी उपयोगी पडणाऱ्या आहेत. निरक्षर पालक पाठ्यपुस्तकातील उणीवा दाखवू शकले नाहीत.

६ पालकांनी पाठ्यपुस्तक लेखनासाठी सुचविलेले उपयुक्त बदल, - उपक्रम आणि सूचना :-

पाठ्यपुस्तक अधिक निर्दोष व्हावे, तंत्रशुध्द व्हावे, उद्दिष्टानुरूप त्याचे लेखन व्हावे, विद्यार्थी व अध्यापक यांच्याकडून त्याचा वापर अधिकाधिक व्हावा या भूमिकेतून पाठ्यपुस्तक लेखनात कोणते बदल हवेत, त्यासाठी सूचना आणि उपक्रम सुचविण्यासाठी पालक प्रश्नावलीत प्रश्नांची योजना केली होती. पालकांनी त्याला जो प्रतिसाद दिला व जे त्यांनी बदल सुचविले, ज्या सूचना केल्या, जे उपक्रम सांगितले त्यात बरीच पुनरावृत्ती दिसून आली. पुनरावृत्ती टाळून असलेले बदल, सूचना व उपक्रम त्यांच्याच शब्दात खाली दिले आहेत.

[१] भाषा सोपी वापरली पाहीजे. त्या त्या काळचा इतिहास डोळ्यापुढे उभा राहिला पाहिजे.

[२] पाठ्यपुस्तकात विविध प्रकारचे भरपूर प्रश्न द्यावेत.

[३] पाठ्यपुस्तकात बदल करण्यापेक्षा परीक्षा पध्दतीतच बदल हवा. आज जी Objective Method ची परीक्षा पध्दत आहे ती दूर करून Subjective Method ची करावी.

[४] पहिली गोष्ट म्हणजे शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातूनच शिकवावे.

[५] मुद्देसूद लिखाण हवे.

[६] अपेक्षीत प्रश्नांची उत्तरे, त्यांचे मुद्दे पुस्तकांत मोठ्या अक्षरात लिहावेत.

[७] धडे छोटे म्हणजे पांच, सहा पाने असावेत, आणि लघुत्तरी प्रश्नांच्या उत्तरातील शब्द मोठ्या अक्षरात असावेत.

[८] पुस्तकाचा आकार मध्यम असावा, पुस्तक बांधणी आकर्षक व मजबूत असावी.

[९] इतिहास, नागरिक शास्त्र हे एकाच पेपरमध्ये समाविष्ट असल्याने नागरिक शास्त्राचे पुस्तक, स्वतंत्र पुस्तक ठेवण्याचे कारण काय ? इतिहासाच्या पुस्तकातच नागरिकशास्त्राचा समावेश करावा म्हणजे विनाकारण जास्त किंमत जाणार नाही. मुलानांही पुस्तक सांभाळून ठेवण्याचा त्रास नाही.

[१०] पाठ्यांश संपल्यावर सर्व प्रकारचे प्रश्न त्याखाली दिलेले असावेत. व्यवसायमालेप्रमाणे काही जागा सोडून ते प्रश्न विद्यार्थ्यांना सोडवावयास लावावे.

[११] महत्वाचे प्रश्न देऊन त्याची उत्तरेपण मुद्देसूद व थोडक्यात द्यावीत.

[१२] पाठाखाली प्रश्नासमोर कंसात त्या प्रश्नांचे उत्तर सापडेल त्या पृष्ठाचा व परिच्छेदाचा क्रमांक द्यावा.

[१३] पाठ्यपुस्तकातील स्थूलता कमी व्हावी. निवेदनशैली चांगली असावी.

[१४] पाठ्यपुस्तकावरून अभ्यास केल्यास जास्त गुण मिळू शकतात याबाबत विद्यार्थ्यांना पटवून देणे आवश्यक आहे.

पाठ्यपुस्तक लेखनाबाबतच्या सूचना आणि उपक्रम वरील प्रमाणे पालकांनी सुचविले आहेत. या सूचना नाविण्यपूर्ण व अभ्यासू आहेत. परीक्षा पध्दती Subjective Method ची करावी, शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातूनच शिकवावे, अपेक्षीत प्रश्नांची उत्तरे व त्याबाबतचे मुद्दे मोठ्या अक्षरात छापावेत, धडे छोटे छोटे म्हणजे पांच, सहा पानाचे असावेत. इतिहास व नागरिक शास्त्राचे एकच पुस्तक असावे, धड्याखाली व्यवसायमालेप्रमाणे काही प्रश्न सोडवून द्यावेत आणि पाठ्यपुस्तकातील रुक्षता कमी करावी इत्यादी महत्वाच्या सूचना आहेत.

५.५ <u>समारोप</u> :-

प्रस्तुत प्रकरणात "माध्यमिक शाळेतील पाठ्यपुस्तक व मार्गदर्शिकाचा इतिहास अध्यापन - अध्ययनातील उपयोगाचा चिकित्सक अभ्यास" करण्यासाठी विद्यार्थी, अध्यापक आणि पालक प्रश्नावलीला विद्यार्थी, अध्यापक आणि पालक यानी दिलेल्या प्रतिसादांचे विश्लेषण विवरण केले असून त्याचा अन्वयार्थ लावलेला आहे. प्रश्नावलीला मिळालेल्या प्रतिसादात्मक सामुग्रीच्या विश्लेषण, वर्गीकरणावर आधारित निष्कर्ष आणि त्यावर आधारित शिफारशी यांचे विवरण पुढील प्रकरणात केले आहे.

=-=-=-=-=-=-=-=

=-=-=-=